||अंतरी पेटवू ज्ञानज्योत||

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

P.B.No.: 80, UMAVINAGAR, JALGAON-425 001 (M.S.)

★★★★ NAAC REACCREDITED

EPABX : (0257) 2257301 -28
Fax No. : (0257) 2258403 - 407
Gram : "UTTAMVIDYA"
Web Site : www.nmu.ac.in
E-mail : nmunijal_jal@sancharnet.in

# श्रेणी / गुणवत्ता सुधार योजना

ज्या विद्यार्थ्यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची बी.ए. / बी.कॉम. / बी.एस्सी. / बी.ई. / एल.एल.बी. / बी.एस.एल. / बी. फार्मसी / बी.बी.ए. / बी.सी.ए. / बी.एस.डब्ल्यू. / बी.बी.एम. (ई-कॉमर्स) / बी.बी.एम. (बी.बी.एस.) / एम.ए. / एम.कॉम. / एम.सी.ए. / एम.एड. / एम.लिब. / एम.एस.डब्ल्यू. / एम.बी.ए. / एम.ए. (मास कम्युनिकेशन) / एम.बी.एम. (कॉम्प्यूटर मॅने / पर्सनल मॅन / मॅने. स्टडीज) ही पदवी घेतली असेल व ज्यांना सदर पदवी श्रेणी / गुणवत्ता सुधार करावयाची असेल अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अधिकार मंडळाने अध्यादेश १७४ लागू केलेला आहे.

अध्यादेश १७४ अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना श्रेणी / गुणवत्ता सुधार करावयाची आहे, त्यासाठी संबंधित गरजू विद्यार्थ्याने नियमित विद्यार्थी म्हणून ज्या महाविद्यालयातून पदवी / पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केली आहे, त्या महाविद्यालयाच्या मा. प्राचार्यांमार्फत दर वर्षी दि. १ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट या कालावधीत विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा.

नाव नोंदणी कार्यवाही करणेबाबतची नियमावली खाली दिल्याप्रमाणे -

१. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार वर नमुद केलेल्या पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमविची पदवीधारण करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत एका वेळी एकाच वर्गाची नाव नोंदणी करण्याची संधी देण्यात येईल. श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी सलग तीन परीक्षा संधीपर्यंत राहील. त्यास ३ वेळा (उदा. मार्च/एप्रिल २०१३, ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१३ व मार्च/एप्रिल २०१४) मध्ये परीक्षा देता येईल. तथापि, ज्या वर्गाची परीक्षा ऑक्टोबर / नोव्हेंबर मध्ये घेण्यात येत नाही अशा विद्यार्थ्यांसाठी मार्च / एप्रिल अशी संधी मोजण्यात येईल. या तीन संधीमध्ये जर विद्यार्थ्याची श्रेणी / गुणवत्ता सुधार झाली नाही तर त्यास तीन पेक्षा जास्तीच्या संधीची आवश्यकता वाटत असल्यास अशा जास्तीच्या दोन संधी म्हणून सलग पाच संधी पर्यंत नोंदणी ठेवता येईल व पुढील दोन जास्तीच्या प्रत्येक संधीसाठी परीक्षा अर्जासोबत अतिरिक्त परीक्षा शुल्क रु.१,०००/- घेण्यात येईल. सदर पाच संधीत श्रेणी / गुणवत्ता सुधार झाली नाही किंवा सदर संधी संपण्यापूर्वी नाव नोंदणी रद्द केली तर अशा विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणास्तव पुन्हा नव्याने श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करता येणार नाही.

२. नाव नोंदणी अर्ज व माहिती पत्रक विद्यापीठाचे संकेतस्थळ www.nmu.ac.in वर उपलब्ध आहे. नाव नोंदणी अर्जासोबत विद्यार्थ्याला खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

i) मुळ गुणपत्रक व दोन प्रमाणित छायांकित प्रती

ii) मुळ पासींग सर्टिफिकेट व दोन प्रमाणित छायांकित प्रती

iii) पदवी प्रमाणपत्र घेतले असल्यास मुळ प्रमाणपत्र व दोन प्रमाणित छायांकित प्रती. प्रमाणपत्र घेतले नसल्यास खालील नमूद केलेल्या परिशिष्ट क्र.२ नुसार रु.२०/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

iv) परीक्षा अर्ज, परिशिष्ट क्र.१ व पदवी प्रमाणपत्रासाठी स्कॅनिंग स्लीप

३. श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी अर्जासोबत भरावयाचे शुल्क १ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट या कालावधीत

i) नोंदणी शुल्क रू.२५०/-

ii) परीक्षा शुल्क नियमित परीक्षा शुल्काच्या दुप्पट

iii) के.मू.प्र. शुल्क रू.१००/-

iv) गुणपत्रक शुल्क व पासींग सर्टिफिकेट शुल्क परीक्षेच्या परिपत्रकानुसार

v) पदवी प्रमाणपत्र शुल्क रू.२५०/-

त्यानंतर दि. १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत वरील शुल्कासोबत नोंदणी विलंब शुल्क रू.२००/- परीक्षा अर्ज विलंब शुल्क रू.१००/- भरणे आवश्यक राहील.

३१ ऑगस्ट नंतर कुठल्याही परिस्थितीत नाव नोंदणी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

४. अध्यादेशाप्रमाणे ज्या वर्गासाठी नाव नोंदणी करावयाची आहे, त्यासाठी असणाऱ्या एकूण लेखी पेपरच्या कमीत कमी १/३ पेपरची नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. (जर दोन किंवा दोन पेक्षा अधिक वर्ग मिळून श्रेणी देण्यात येत असेल तर श्रेणीसाठी सर्व वर्गांच्या लेखी पेपरपैकी किमान १/३ इतक्या पेपरची नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.) जे विषय नाव नोंदणी अर्जात नमुद केले असतील, तेच विषय परीक्षा अर्जावर नमुद करणे आवश्यक आहे. त्याच विषयाची परीक्षा श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत देता येईल. मात्र एकदा घेतलेले विषय कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाहीत. पूर्वी प्रापत केलेल्या मूळ गुणपत्रकात जर कोणत्याही विषयास अध्यादेश लाभ देण्यात आला असेल तर श्रेणी सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करताना सदरच्या विषयाचीही पुन्हा नाव नोंदणी करणे बंधनकारक राहील. सदची अट जनरल नॉलेज या विषयास लागू होणार नाही.

५. ज्या विद्यार्थ्यांनी ५ वर्षाच्या आत विद्यापीठाची पदवी / पदव्युत्तर पदवी घेतली असेल त्यांनाच श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करता येईल. ५ वर्षापूर्वी पदवी / पदव्युत्तर पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना नाव नोंदणी करता येणार नाही. कारण अभ्यासक्रम / पॅटर्न बदल झाले असल्यामुळे समकक्ष विषयांची अडचण येते.

६. विद्यार्थ्यांनी जुन्या अभ्यासक्रमानुसार पदवी संपादन केली असेल तर विद्यापीठ नियमानुसार जुन्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी संधी उपलब्ध असल्यास त्या संधीनुसार श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत परीक्षा देता येईल. परंतु, जुन्या अभ्यासक्रमानुसार संधी संपुष्टात आली असल्यास विद्यार्थ्यास समकक्ष विषयांचीच परीक्षा द्यावी लागेल.

७. श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत विद्यार्थ्यास अध्यादेशाप्रमाणे ग्रेस / कन्डोनेशनच्या गुणांचा फायदा मिळणार नाही. तसेच सदर विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे बक्षीस पदक इत्यादीचा लाभ मिळणार नाही.

८. वार्षिक जुन्या अभ्यासक्रमातील पदवी / पदव्युत्तर पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना एका विषयासाठी सत्र पध्दतीतील दोन समकक्ष विषयांची परीक्षा द्यावी लागेल.

९. ज्या विषयांमध्ये विद्यापीठाची लेखी व प्रात्यक्षिक किंवा तोंडी परीक्षा द्यावी लागत असेल किंवा विद्यापीठाची लेखी व महाविद्यालयामार्फत घेतली जाणारी किंवा विद्यापीठ विभागामार्फत घेण्यात येणारी विभागीय अंतर्गत परीक्षा घेतली जात असेल अशा विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे, तोंडी परीक्षेचे किंवा अंतर्गत परीक्षेचे पूर्वीच प्राप्त केलेले मुळ गुण ग्राह्य धरले जातील. विद्यार्थ्यांना श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत फक्त लेखी परीक्षेसाठी पेपरची परीक्षा देता येईल. ज्या लेखी पेपरच्या हेडमध्ये तोंडी परीक्षा आहे. उदा. एम.ए. इंग्रजी करीता इंग्रजी पेपर क्र. १ ला ८० पैकीचे गुण व मागील परीक्षेच्या तोंडी परीक्षेचे गुण ग्राह्य धरण्यात येऊन निकाल जाहीर करण्यात येईल. तसेच ज्या विषयांना पूर्वी प्रात्यक्षिक परीक्षा नव्हती, त्यांना त्या विषयाच्या एकूण गुणांच्या टक्केवारीत

मिळालेल्या गुणांचे रूपांतर करुन गुण देण्यात येतील. तसेच श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत ज्या विद्यार्थ्याचे नोंदणी करते वेळी दिलेले उद्दीष्ट पूर्ण झाल्यास त्याला गुणपत्रक पाठविण्यात येईल. परंतु, ज्या विद्यार्थ्याचे उद्दीष्ट पूर्ण होणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांना लेजरची प्रत पाठविण्यात येईल.

१०. श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत निकाल जाहीर करतांना ज्या विषयाची निवड, श्रेणी सुधार करण्यासाठी केलेली आहे, त्या विषयांचे नवीन प्राप्त झालेलेच गुण ग्राह्य धरुन श्रेणी सुधार योजनेचा निकाल जाहीर करण्यात येईल.

११. श्रेणी सुधार योजने अंतर्गत रिपीटर विद्यार्थ्याने नाव नोंदणी केलेल्या सर्व विषयांची पुन्हा परीक्षा देणे आवश्यक राहील. मात्र रिपीटर विद्यार्थ्यास विषयामध्ये सुट पाहिजे असल्यास (विद्यार्थ्याला विषय द्यावयाचा नसल्यास) त्याने परीक्षेसाठी निवडलेल्या विषयामध्ये किमान ५०% गुण आवश्यक राहतील. याप्रमाणे विषयांसाठी सुट घ्यावयाची असल्यास विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज भरतेवेळी परिशिष्ट क्र.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे लेखी कळविल्यास त्यास विषयात सुट घेता येईल.

१२. ज्या विद्यार्थ्याची श्रेणी बदलत नसेल परंतु गुणात वाढ झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांना त्यांनी गुणपत्रकाची मागणी त्यावेळी केल्यास वाढीव गुणांचे गुणपत्रक देता येईल. मात्र त्याकरीता त्यांना नाव नोंदणी रद्द करण्याबाबतचा हस्तलिखित अर्ज मा. प्राचार्य, यांच्या शिफारशीनुसार सादर करणे आवश्यक राहील. जर अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील संधीमध्ये गुणात वाढ झाली नाही व त्यांनी मागील संधीत गुणात वाढ झाल्याने गुणपत्रक मागणी केल्यास त्यांना वाढीव गुणाचे गुणपत्रक दिले जाणार नाही. तर अशा विद्यार्थ्यांना त्यांनी नोंदणी करते वेळी जमा केलेले पूर्वीचे गुणपत्रक देण्यात येईल. नोंदणी करताना जेवढे विषय भरले असतील त्या सर्व विषयाच्या पूर्वीच्या सर्व गुणांची संपादणूक रद्द समजण्यात येईल. त्यामुळे नोंदणीकृत काही विषयांचे पूर्वीचे गुण व काही विषयांचे नवीन गुण असे कुठल्याही परीक्षार्थीचे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**परिशिष्ट क्र.१**

(नाव नोंदणी करते वेळी भरुन देणे आवश्यक आहे.)

मी ------------------------------------------------------- द्वारा ---------------------- महाविद्यालयात ------------------------------------------ या वर्गाची श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करीत आहे.

१. मी संपूर्ण नियमावली वाचलेली असून मला ती मान्य आहे.
२. मला उत्तीर्ण (पास क्लास) मिळलेला असून ही नाव नोंदणी मी द्वितीय श्रेणी ५५% गुण / प्रथम श्रेणी मिळविण्यासाठी करीत आहे.
३. मला द्वितीय श्रेणी मिळालेली असून ही नाव नोंदणी मी ५५% गुण / प्रथम श्रेणी मिळविण्यासाठी करीत आहे.

वरील प्रमाणे माझी श्रेणी / गुणवत्ता सुधार झाल्यासच माझा निकाल जाहीर करुन मला सुधारीत गुणपत्रक देण्यात यावे. अन्यथा, मला मिळालेले गुण फक्त कळविण्यात यावे.

विद्यार्थ्याची सही ----------------------------

प्राचार्यांची सही व शिक्का ---------

दिनांक : --------------------

## परिशिष्ट क्र.२

(नाव नोंदणी करते वेळी रु.२०/- च्या स्टॅम्प पेपरवर खालीलप्रमाणे मा. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हिट) सादर करणे आवश्यक आहे.)

मी ---------------------------------------------------- सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की, मी --------- ----------------------------- या महाविद्यालयातून सन -------------------- या वर्षी --------- पदवीचे परीक्षा उत्तीर्ण झालो / झाली आहे.

१. * मी विद्यापीठाकडून आजपर्यंत ------------------ या पदवीचे पदवी प्रमाणपत्र घेतलेले नाही व पदवी मिळण्यासाठी अर्ज केलेला नाही.

किंवा

२. * मी पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला आहे / पदवी प्रमाणपत्र मिळणेबाबत शुल्क भरलेले आहे. मात्र पदवी प्रमाणपत्र प्राप्त नाही. पदवी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास मी विद्यापीठास लगेच परत करेल.

यातील संपूर्ण मजकूर खरा असून खोटा आढळल्यास मी कायदेशिर शिक्षेस व दंडास पात्र राहील.

मा. कार्यकारी दंडाधिकारी विद्यार्थ्याचे नाव --------------------

*लागू नसेल ते खोडावे विद्यार्थ्याची स्वाक्षरी ------------------

## परिशिष्ट क्र.३

(श्रेणी सुधार योजने अंतर्गत रिपीटर विद्यार्थ्यांना विषयात सुट द्यावयाची असल्यास सदर विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जासोबत भरणे आवश्यक आहे.)

मी ---------------------------------------------- द्वारा --------------------------- --- या महाविद्यालयातून --------------------------------------------------- या वर्गाची श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत मार्च / एप्रिल -------------- ला परीक्षा दिली. मला खालील दिलेल्या विषयांमध्ये सुट द्यावयाची आहे.

| अ.क्र. | विषय | मिळालेले गुण |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |

विद्यार्थ्याची सही ------------------------------------

प्राचार्यांची सही व शिक्का -----------------------------------

वरील नियम व अध्यादेश सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील. तरी मा. प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की, सदर प्रकटनाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देऊन त्यात नमुद नियमानुसार नाव नोंदणी अर्ज तसेच परीक्षा अर्ज तपासून नंतर विद्यापीठात पाठवावेत, ही विनंती.

सही/-

**(डॉ. ध.ना. गुजराथी)**

परीक्षा नियंत्रक

जा.क्र. : उमवि/७-अ/श्रेणी सुधार/३५२६/२०१४

दिनांक : २५/०७/२०१४

||अंतरी पेटवू ज्ञानज्योत||

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON**

**P.B.No.: 80, UMAVINAGAR, JALGAON-425 001 (M.S.)**

☆☆☆☆
NAAC REACCREDITED

EPABX : (0257) 2257301 -28
Fax No. : (0257) 2258403 - 407
Gram : "UTTAMVIDYA"
Web Site : www.nmu.ac.in
E-mail : nmunijal_jal@sancharnet.in

जा.क्र. : उमवि/७-अ/श्रेणी सुधार/३५२७/२०१४ दिनांक : २५/०७/२०१४.

प्रति,

१) **उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व**
**महाविद्यालयांचे मा. प्राचार्य**
**तथा मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक**

२) **मा. विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग,**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**

**विषय :- श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करणेबाबत..**
**संदर्भ :- श्रेणी सुधार नियमावली जा.क्र. : उमवि/७-अ/श्रेणी सुधार/३५२६ /२०१४ दि. २५/०७/२०१४**

महोदय,

श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत असलेली नियमावली जा.क्र. श्रेणी सुधार नियमावली जा.क्र. : उमवि/७-अ/श्रेणी सुधार/३५२६/२०१४ दि. २५/०७/२०१४ अन्वये लागू करण्यात आलेली असून सदर नियमावली विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर नियमावलीनुसार, ज्या विद्यार्थ्यांना अध्यादेश १७४ नुसार श्रेणी / गुणवत्ता सुधार करावयाची आहे, त्यांनी ज्या महाविद्यालयातुन पदवी / पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केली आहे त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत विहित शुल्कासह दि. १ ऑगस्ट, २०१४ पर्यंत व त्यानंतर १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, २०१४ पर्यंत **विलंब शुल्कासह** विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठाकडे सादर करावेत.

विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

सही/-
**(डॉ. ध.ना. गुजराथी)**
**परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीसाठी** :-

१) मा. कुलसचिव, उमवि, जळगाव
२) उपकुलसचिव / सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, उमवि, जळगाव
३) केंद्र प्रमुख, संगणक विभाग, उमवि, जळगाव
४) कक्ष अधिकारी (कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षणशास्त्र), उमवि, जळगाव